विमुक्त जाती,भटक्या जमाती,इतर मागासवर्ग प्रवर्ग आणि विशेष मागास प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती/गट यामध्ये मोडत नसल्याबाबत देण्यात येणाऱ्या नॉन-क्रिमीलेयर प्रमाणपत्राच्या कालावधी वैधतेबाबत.

# महाराष्ट्र शासन
## सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
## शासन परिपत्रक क्रमांकः सीबीसी-२०१३/प्र.क्र.१८२/विजाभज-१

मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२.

दिनांक : १७ ऑगस्ट, २०१३

<u>वाचा</u>

१) केंद्र शासन,मिनिस्ट्री ऑफ पर्सोनेल,पब्लिक ग्रिव्हन्सेस ऍण्ड पेन्शन्स (डिपार्टमेंट ऑफ पर्सोनेल ऍण्ड ट्रेनिंग) कडील कार्यालयीन ज्ञापन क्रमांक ३६०१२/२२/९३-इएसटीटी (एस.सी.टी.) दिनांक ८ सप्टेंबर, १९९३

२) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्र. सीबीसी १०९४/ प्र.क्र.८६/मावक-५,दिनांक १६ जून,१९९४

३) शासन निर्णय, समाजकल्याण, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्र. सीबीसी-१०९४/ प्र.क्र.८६/मावक-५,दिनांक ५ जून,१९९७

४) शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग क्र. सीबीसी-१०/ २००१/प्र.क्र.१२०/मावक-५,दिनांक १ नोव्हेंबर, २००१

५) केंद्र शासन, मिनिस्ट्री ऑफ पर्सोनेल,पब्लिक ग्रिव्हन्सेस ऍण्ड पेन्शन्स (डिपार्टमेंट ऑफ पर्सोनेल ऍण्ड ट्रेनिंग) कडील कार्यालयीन ज्ञापन क्रमांक ३६०३३/४/९७-इएसटीटी (आर.ई.एस.), दिनांक २५ जुलै, २००३

६) केंद्र शासन, मिनिस्ट्री ऑफ पर्सोनेल,पब्लिक ग्रिव्हन्सेस ऍण्ड पेन्शन्स (डिपार्टमेंट ऑफ पर्सोनेल ऍण्ड ट्रेनिंग) कडील कार्यालयीन पत्र क्रमांक ३६०३३/५/२००४-इएसटीटी (आर.ई.एस.), दिनांक १४ ऑक्टोंबर, २००४

७) शासन पत्र, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व क्रीडा व विशेष सहाय्य विभाग क्र. सीबीसी-१०/२००४/प्र.क्र.६८७/मावक-५, दिनांक २९ ऑक्टोंबर,२००४

८) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. सीबीसी-१०/ २००६/प्र.क्र.१२२/मावक-५,दिनांक २० ऑक्टोंबर, २००६

९) केंद्र शासन, मिनिस्ट्री ऑफ पर्सोनेल,पब्लिक ग्रिव्हन्सेस ऍण्ड पेन्शन्स (डिपार्टमेंट ऑफ पर्सोनेल ऍण्ड ट्रेनिंग) कडील कार्यालयीन ज्ञापन क्रमांक ३६०३३/३/२००४-इएसटीटी (आर.ई.एस.), दिनांक १४ ऑक्टोंबर, २००८

१०) शासन निर्णय, सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग, क्र. सीबीसी - १० / २००८ / प्र.क्र. ६९७ / मावक - ५, दिनांक १३ जानेवारी,२००९

**११) शासन पत्र सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य व क्रीडा व विशेष सहाय्य विभाग, क्र. सीबीसी-१०/२००८/प्र.क्र.६९७/मावक-५, दिनांक २७ फेब्रुवारी,२००९**
**१२) शासन पत्र, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. इमाव-२०१३/ प्र.क्र.१/विजाभज-१,दिनांक २२ जानेवारी,२०१३.**
**१३) शासन परिपत्रक, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. सीबीसी-२०१२/ प्र.क्र.१८२/विजाभज-१,दिनांक २५ मार्च,२०१३.**
**१४) शासन निर्णय, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, क्र. सीबीसी-१०/२००८/ प्र.क्र.६९७/विजाभज-१, दिनांक २४ जून,२०१३.**

**प्रस्तावना**

मा.सर्वोच्च न्यायालयाने इंदिरा सहानी व इतर रिट याचिका क्र.९३०/९० च्या अनुषंगाने दि.१६.११.१९९२ रोजी दिलेल्या आदेशानुसार केंद्र शासनाने इतर मागासवर्ग प्रवर्गाकरीता क्रिमीलेअरचे तत्व मिनिस्ट्री ऑफ पर्सोनेल,पब्लिक ग्रिव्हन्सेस ऍण्ड पेन्शन्स (डिपार्टमेंट ऑफ पर्सोनेल ऍण्ड ट्रेनिंग) यांच्या कार्यालयीन ज्ञापन क्रमांक ३६०१२/२२/९३-इएसटीटी (एस.सी.टी.) दिनांक ८ सप्टेंबर, १९९३ अन्वये लागू केले आहे. सदर कार्यालयीन ज्ञापनान्वये इतर मागासवर्ग प्रवर्गास आरक्षणाचे फायदे देण्यासाठी इतर मागासवर्ग प्रवर्गातील उन्नत व प्रगत व्यक्ति/गट वगळून इतर व्यक्तिंना उन्नत व पगत व्यक्ति/गटामध्ये मोडत नसल्याबाबतचे प्रमाणपत्र (Non-Creamy Layer Certificate) देण्याच्या कार्यपध्दतीसंदर्भात केंद्र शासनाने निकष विहीत केलेले आहेत. तसेच सदर निकषासंदर्भात केंद्र शासनाने त्यांच्या दिनांक १४ ऑक्टोंबर,२००४ व दिनांक १४ ऑक्टोंबर,२००८ च्या कार्यालयीन पत्र व ज्ञापनान्वये वेळोवेळी स्पष्टीकरणही दिलेले आहे. सदरहू कार्यालयीन ज्ञापनान्वये केंद्र शासनाने वेळोवेळी दिलेले सर्व आदेश/स्पष्टीकरण राज्य शासनाने राज्यातील विमुक्त जाती,भटक्या जमाती,इतर मागास वर्ग आणि विशेष मागास प्रवर्गास लागू केलेले आहे. या संदर्भात शासन परिपत्रक दिनांक २५ मार्च,२०१३ अन्वये आरक्षणाचे फायदे देण्यासाठी त्या प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती/गट (क्रिमीलेअर) वगळण्याबाबतचे निकष व कार्यपध्दती यांचे एकत्रीकरण व सुसूत्रीकरण करण्यात आलेले आहे. या शासन परिपत्रकातील वाचा येथील केंद्र शासनाच्या दिनांक २५.०७.२००३ च्या ऑफिस मेमोरेन्डम यास अनुसरुन परि.२ मध्ये विमुक्त जाती,भटक्या जमाती,इतर मागास प्रवर्ग आणि विशेष मागास प्रवर्गातील उन्नत व प्रगत व्यक्ती/गट यामध्ये मोडत नसल्याच्या नॉनक्रिमीलेअर प्रमाणपत्राच्या पडताळणीच्या वैधतेचा कालावधी याबाबत सूचना दिलेल्या आहे. परंतु राज्यातील काही विभाग/जिल्हयातील सक्षम प्राधिका-याकडून निर्गमित करण्यात येणा-या नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राच्या कालावधीमध्ये एकवाक्यता नसल्याचे शासनास दिसून आले आहे. त्या अनुषंगाने नॉन क्रिमीलेअरचे प्रमाणपत्राचा कालावधी राज्यात समान असावा यासाठी सूचना निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन परिपत्रक**

केंद्र शासनाने मा.सर्वोच्च न्यायालयाने इंदिरा सहानी व इतर रिट याचिका क्र.९३०/९० मध्ये दिलेल्या निकालास अनुसरुन इतर मागासवर्गीयांसाठी नॉनक्रिमीलेअरचे तत्व दि.०८.०९.१९९३ च्या

कार्यालयीन ज्ञापनाव्दारे लागू केलेले आहेत व तद्नंतर केंद्रशासनाने वेळोवेळी काही बाबीही स्पष्ट केलेल्या आहेत. त्यानुसार नॉन क्रिमीलेअरचे प्रमाणपत्र हे मागील सलग ३ वर्षाच्या वर्षनिहाय वार्षिक उत्पन्नाच्या आधारावर देण्याची विहीत केलेले आहे. मागील ३ वर्षाच्या वार्षिक उत्पन्नापैकी कोणत्याही एका वर्षाचे वार्षिक उत्पन्न हे केंद्रशासनाने विहीत केलेल्या मर्यादेपेक्षा कमी असल्यास (सध्या रु.६.०० लाख) संबंधितास नॉन क्रिमीलेअरचे प्रमाणपत्र देण्यात येते. त्यानुसार विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागास प्रवर्ग आणि विशेष मागास प्रवर्गातील उन्नत आणि प्रगत व्यक्ती/गट यामध्ये मोडत नसल्याचे नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्राच्या पडताळणीच्या वैधतेचा कालावधीबाबत खालीलप्रमाणे सूचना देण्यात येत आहे.

१. ज्या विद्यार्थी/उमेदवारांच्या पालकांचे मागील सलग तीन वर्षातील प्रत्येक वर्षाचे उत्पन्न हे जर रु.६लक्षापेक्षा कमी असेल तर अशा विद्यार्थी/उमेदवारांना तीन वर्षाच्या कालावधीकरीता नॉन क्रिमिलेअरचे प्रमाणपत्र देण्यात यावे.

२. ज्या विद्यार्थी/उमेदवारांच्या पालकांचे मागील तीन वर्षाच्या उत्पन्नापैकी कोणत्याही दोन वर्षाचे उत्पन्न हे जर रु. ६ लक्षापेक्षा कमी असेल तर अशा विद्यार्थी/उमेदवारांना दोन वर्षाच्या कालावधीकरीता नॉन क्रिमिलेअरचे प्रमाणपत्र देण्यात यावे.

३. ज्या विद्यार्थी/उमेदवारांच्या पालकांचे मागील तीन वर्षाच्या उत्पन्नापैकी एक वर्षाचे उत्पन्न हे जर रु.६लक्षापेक्षा कमी असेल तर अशा विद्यार्थी/उमेदवारांना एक वर्षाच्या कालावधीकरीता नॉन क्रिमिलेअरचे प्रमाणपत्र देण्यात यावे.

सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०८१९१५३१०१७२२२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kiran Pandurang Wadte

Digitally signed by Kiran Pandurang Wadte
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Social Justice &Spl Assistance, postalCode=400032, st=Maharashtra, cn=Kiran Pandurang Wadte
Date: 2013.08.19 16:41:28 +05'30'

**कि. पां. वडते**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.राज्यपाल यांचे सचिव.
२. मा.मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव.
३. मा.उपमुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
४. मा.मंत्री (सामाजिक याय) यांचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
५. मा.राज्यमंत्री (सामाजिक याय) याचे खाजगी सचिव,मंत्रालय,मुंबई
६. मा.मुख्य सचिव,मंत्रालय,मुंबई

७. मा.अप्पर मुख्य सचिव,महसूल व वन,मंत्रालय,मुंबई
८. महासंचालक,माहिती व जनसंपर्क संचालनालय,मंत्रालय,मुंबई (प्रसिध्दीसाठी)
९. आयुक्त,समाजकल्याण संचालनालय,महाराष्ट्र राज्य पुणे
१०. संचालक,वि.जा.भ.ज., इ.मा.व. व वि.मा.प्र. कल्याण संचालनालय,महाराष्ट्र राज्य,पुणे
११. सर्व विभागीय आयुक्त (महसुल)
१२. सर्व जिल्हाधिकारी.
१३. सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद
१४. सचिव,महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई (पत्राने)
१५. सर्व उपविभागीय अधिकारी (महसुल)/सर्व उप जिल्हाधिकारी (महसुल)/सर्व तहसिलदार
१६. सर्व प्रादेशिक उपायुक्त समाज कल्याण/सर्व सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण/सर्व जिल्हा समाज कल्याण अधिकारी
१७. महालेखापाल, (लेखापरिक्षा व लेखा अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपूर
१८. मा.सचिव, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग यांचे स्वीय सहायक,मंत्रालय,मुंबई
१९. सर्व कार्यासन अधिकारी, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई/ निवडनस्ती/ विजाभज-१